| | | |
|---|---|---|
| MHPU07-006196-2024 | दाखल दिनांक | ०९/०८/२०२४ |
| | नोंदणी दिनांक | ०९/०८/२०२४ |
| | निकाल दिनांक | ०८/०७/२०२६ |
| | कालावधी | **०१व, १०म, २९दि.** |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, लोहमार्ग न्यायालय, पुणे**
**यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी एन.जे.चव्हाण)**

**नि.फौ.खटला क्र. १६६/२०२४** **निशाणी क्र. २०**

**(न्यायनिर्णयाचे शिर्षक पान)**
**नमुना क्र. ३२**

**भाग 'अ'**
**[ परिच्छेद ४४(i) भाग ६ फौजदारी नियमावली ]**

| | |
|---|---|
| तक्रार तपशील | भारत सरकार मार्फत श्री. ए. के. धनखड, सहा. उप.निरीक्षक, रेसुब, घोरपडी, जेजुरी चौकी यांच्या तक्रारीवरुन गु.क्र. ७९/२०२४ **कलम १४३** रेल्वे अधिनीयम, १९८९ नुसार दाखल. |
| तक्रारदार | **भारत सरकार**<br>तर्फे<br>श्री. ए. के. धनखड, सहा. उप.निरीक्षक, रेसुब, घोरपडी, जेजुरी चौकी |
| सरकारी अभियोक्ता | श्री. गौरव सिंग, विद्वान सरकारी अभियोक्ता, मध्य रेल्वे, पुणे मंडळ. |
| आरोपी | **संदीप धोंडीराम बांगर**<br>वय – ३१ वर्ष, व्यवसाय – व्यापार,<br>रा.- जेजुरी स्टेशन, जेजुरी, पुणे. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | विद्वान अधिवक्ता श्री. ए. टी. नावडकर |

**भाग – ब**

**[ परिच्छेद ४४(ii) भाग ६ फौजदारी नियमावली ]**

| | |
|---|---|
| घटनेची तारीख | २१/०५/२०२४ |

| | |
|---|---|
| तक्रारची तारीख | २१/०५/२०२४ |
| तक्रारपत्र दाखल तारीख | ०९/०८/२०२४ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | २४/११/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २४/११/२०२५ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची तारीख | - |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०८/०७/२०२६ |
| शिक्षा आदेशाची तारीख, असेल तर | ०८/०७/२०२६ |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप | दोषी किंवा निर्दोषी | लादलेली शिक्षा | खटल्यादरम्यान अटकेचा कालावधी कलम ४६८ भा.ना.सु.सं. नुसार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **संदीप धोंडीराम बांगर** | २१/०५/२०२४ | २२/०५/२०२४ | रेल्वे अधिनियमचे **कलम १४३** | दोषी | **६,०००/-** रु. दंड, दंड न भरल्यास **१२ दिवस** साधा कारावास भोगावा. | निरंक |

**भाग – क**

**अभियोगपक्ष, बचावपक्ष व न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**[ परिच्छेद ४४(iii) भाग ६ फौजदारी नियमावली ]**

| **क्रमांक** | **नाव** | **निशाणी क्र.** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|---|
| अभियोगपक्ष सा.क्र.१ | अशोक कुमार धनकड | १ | फिर्यादी |

**अभियोगपक्ष, बचावपक्ष व न्यायालयाचे निशाणी**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | १२ | तक्रार |

## जप्त मुद्देमालाचे वर्णन :

| अनु.क्र. | मुद्देमालचा क्रमांक | मुद्देमालाचे वर्णन |
|---|---|---|
| १. | - | ६ नग अग्रिम यात्रेचे ई -तिकीट |
| २. | - | ०१ रिअलमी कंपनीचा मोबाईल. |
| ३. | - | ०१ सॅमसंग कंपनीचा मोबाईल |
| ४. | - | १ नग एच. पी. कंपनीचा काळे रंगाचा लॅपटॉप |

## न्या य नि र्ण य

## (दिनांक ०८/०७/२०२६ रोजी अधिघोषित)

आरोपीविरुद्ध रेल्वे सुरक्षा बल, घोरपडी (यापुढे सोईकरिता रे.सु.ब. संबोधण्यात येईल) यांचेतर्फे रेल्वे अधिनियम १९८९ चे कलम १४३ नुसार तक्रार दाखल करण्यात आलेली आहे.

**सरकारपक्षातर्फे घटनेची संक्षिप्त हकीकत अशी आहे की,**

२. दि. २१/०५/२०२४ रोजी तकारदार हे रेसुब जेजुरी येथे सहा.उपनिरीक्षक या पदावर कार्यरत असताना सायबर सेल पुणे यांचेकडुन एक मोबाईल क्रमांक मिळाला होता ज्यावरुन एक इसम पर्सलन युजर आय.डी बनवुन रेल्वे ई-तिकीटांचा अवैध व्यवसाय करत आहे अशी माहिती त्यांना मिळाली. तक्रारदार यांनी त्या माहितीवरुन फोनव्दारे संपर्क केला तेव्हा कळाले की, मोनिका हॉटेल, जेजुरी येथे तो इसम आहे, परंतु त्यादिवशी त्यांना तो मिळुन आला नाही. तक्रारदार यांनी तेथे चौकशी केली असता असे कळाले की, संदीप किराणा स्टोअर्स च्या मागे तो मुलाणी यांच्या घरात भाडयाने राहतो. तक्रारदार हे टीमसह तेथे गेले असता तेथे आरोपी व त्याचे मालक त्यांना मिळाले. तक्रारदार यांनी त्यांना त्यांचा परीचय दिला व येण्याचे कारण सांगितले. त्यावेळी आरोपीने त्याचे नाव संदीप बांगर असे सांगितले. त्यावेळी त्याने पर्सनल युजर आय.डीवरुन तिकीट काढत असल्याचे व प्रत्येक तिकीटामागे १००/- रुपये जास्त घेत असल्याचे त्याने कबुल केले. त्यानुसार तक्रारदार यांनी आरोपीविरुध्द तक्रार दिली ज्या अनुषंगाने गुन्हा क्र. ७९/२०२४ कलम १४३ रेल्वे अधिनीयम, १९८९ नुसार रेसुब घोरपडी कार्यालयात नोंद करण्यात आला. प्राप्त तक्रारीनुसार गुन्ह्याची चौकशी श्री. डी. के. पटेल, उप.निरीक्षक - रेसुब घोरपडी यांनी केली ज्यामध्ये त्यांनी ६ नग अग्रिम यात्रेचे ई -तिकीट, ०१ रिअलमी कंपनीचा मोबाईल, ०१ सॅमसंग कंपनीचा मोबाईल व १ नग एच. पी. कंपनीचा काळे रंगाचा लॅपटॉप जप्ती पंचनाम्याव्दारे जप्त केला. साक्षीदारांचे जबाब नोंदवले. आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने रेल्वे अधिनियम १९८९ चे कलम १४३

नुसार न्यायालयात तक्रारपत्र दाखल केले.

३. तक्रार दाखल झालेनंतर आरोपी न्यायालया समक्ष हजर झाला. सरकारपक्षाने साक्षीदार क्र.१ अशोक कुमार धनकड - फिर्यादी यांना दोषारोप ठेवण्यापूर्वी तपासले. त्यांच्या पुराव्यात दोषारोप ठेवण्या इतपत प्राथमीक पुरावा आल्याने आरोपीवर **नि.क्र. १३** नुसार दोषारोप ठेवण्यात आला. आरोपीस गुन्ह्याबाबत विचारले असता त्याने गुन्हा कबूल नसल्याचे प्रतिकथन केले व त्याच्यावर फौजदारी संपरिक्षा चालविण्याची विनंती केली. दोषारोपातील मजकूर त्याला त्याच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगितला. त्याने गुन्हा नाकबुल असल्याचे कथन करुन त्याचे निवेदन **नि.क्र. १४** वर नोंदवण्यात आले आहे.

४. आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. ए. टी. नावडकर यांनी घटनास्थळ जप्ती पंचनामा **नि.क्र. १५,** जप्त तिकीटे **नि.क्र. १६/१-६** व आरोपीचा कबुली जबाब **नि.क्र. १७** मान्य असल्याचे कथन करुन आरोपीला कमीत कमी द्रव्यदंडाची शिक्षा देण्याची विनंती केली. आरोपीतर्फे कागदोपत्री पुरावा मान्य केल्याने सरकारी अभियोक्ता यांच्या तोंडी विनंतीनुसार अभियोगपक्षाचा पुरावा दि. २०/०१/२०२६ रोजी बंद करण्यात आला. अभिलेखावर आलेल्या तोंडी व कागदोपत्री पुराव्यानुसार फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ प्रमाणे आरोपीचे निवेदन दि. १७/०३/२०२६ रोजी **निशाणी क्र. १८** वर नोंदविण्यात आले. आरोपीचा बचाव हा त्यास चुकीच्या केसमध्ये गोवण्यात आल्याचा आहे.

५. सरकारपक्षाने सादर केलेले साक्षी पुरावे, विद्वान सरकारी अभियोक्ता व आरोपीचे विद्वान अधिवक्ता यांच्या युक्तीवादावरुन खटल्याचे अंतिम निकालाचे अनुषंगाने निम्नलिखीत मुद्दे माझ्या विचाराधीन उद्भवतात. त्याचे सकारण निष्कर्ष मी पुढील प्रमाणे नोंदवत आहे -

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्षाने हे सिध्द केले का की, दि. २१/०५/२०२४ रोजी १२.१५ वाजता दिलावर मुलानी यांचे घरात संदीप किराणा स्टोअर्सच्या पाठीमागे, जेजुरी रेल्वे स्टेशन, जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे येथे आरोपी हा रेल्वे ई-तिकीटांची बेकायदेशीर व विनापरवाना खरेदी व विक्री करीत असताना मिळून आला व अशा प्रकारे रेल्वे अधिनियम, १९८९ चे **कलम १४३** नुसार गुन्हा केला ? | होय. |

| | | |
|---|---|---|
| २ | अंतीम आदेश काय ? | आरोपीस दोषी ठरविण्यात येते. |

## कारणमिमांसा

६. सरकारपक्षाने आरोपीविरुद्ध दोषारोप सिध्द करण्याकरिता साक्षीदार क्र.१ श्री. श्री. अशोक कुमार धनकड - फिर्यादी यांना **निशाणी क्र. १** वर तपासले आहे. त्यांनी त्यांचे तोंडी पुराव्यामध्ये **नि.क्र. १२** वरील तक्रार सिध्द केलेली आहे. प्रकरणाच्या दरम्यान आरोपीने **नि.क्र. १५** वरील घटनास्थळ जप्ती पंचनामा, **नि.क्र. १६/१-६** वरील जप्त तिकीटे व **नि.क्र. १७** वरील स्वतःचा कबुली जबाब मान्य केले असल्याने सरकारपक्षामार्फत स्वतंत्र पंच साक्षीदारांना तपासण्यात आलेले नाही. वरीष्ठ सरकारी अभियोक्ता श्री. गौरव कुमार सिंग यांच्या तोंडी विनंतीनुसार अभियोगपक्षाचा पुरावा नि.क्र. १ खाली आदेश पारीत करुन दि. २०/०१/२०२६ रोजी बंद करण्यात आला.

**मुद्दा क्र.१ करीता -**

७. सरकारपक्षाने आरोपीविरुध्द रेल्वे अधिनियम, १९८९ चे **कलम १४३** नुसार तक्रार दाखल केली आहे. सबब, या ठिकाणी रेल्वे अधिनियम, १९८९ चे कलम १४३ पुर्नोरुत्पादीत करणे गरजेचे आहे -

**कलम १४३- (१)** कोणताही व्यक्ती, जो रेल्वे सेवक किंवा या बाबतीत अधिकृत एजंट नाही -

**(अ)** रेल्वेवर प्रवास करण्यासाठी किंवा ट्रेनमधील प्रवासासाठी आरक्षित जागेसाठी तिकिटे मिळवणे आणि पुरवणे याचा व्यवसाय चालवतो; किंवा

**(ब)** स्वतः किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या माध्यमातून कोणताही असा व्यवसाय चालवण्याच्या उद्देशाने तिकिटे खरेदी किंवा विक्री करतो किंवा खरेदी किंवा विक्री करण्याचा प्रयत्न करतो, तर त्याला तीन वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा किंवा दहा हजार रुपयांपर्यंत दंड, किंवा दोन्ही, आणि त्याने मिळवलेली, पुरवलेली, खरेदी केलेली, विकलेली किंवा खरेदी किंवा विक्री करण्याचा प्रयत्न केलेली तिकिटे जप्त केली जातील.

तथापि, न्यायालयाच्या निर्णयात विशेष आणि पुरेसे कारण नसल्यास, अशा शिक्षेची किमान मुदत एक महिन्यापर्यंतचा कारावास किंवा पाच हजार रुपयांचा

दंड असावा.

**(२)** जो कोणी या कलमानुसार शिक्षापात्र गुन्ह्याला साहाय्य करतो, तो गुन्हा झाला किंवा नाही, त्याला त्या गुन्ह्यासाठी दिलेली तीच शिक्षा दिली जाईल.

८. प्रस्तुतच्या प्रकरणात आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता सरकारपक्षाला सर्वप्रथम हे सिद्ध करणे गरजेचे आहे की, दि. २१/०५/२०२४ रोजी १२.१५ वाजता दिलावर मुलानी यांचे घरात संदीप किराणा स्टोअर्सच्या पाठीमागे, जेजुरी रेल्वे स्टेशन, जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे येथे आरोपी हा रेल्वे ई-तिकीटांची बेकायदेशीर व विनापरवाना खरेदी व विक्री करीत असताना मिळून आला. त्याकरीता अशोक कुमार धनकड - फिर्यादी यांना **निशाणी क्र. १** वर तपासले आहे. त्यांनी त्यांचे साक्षीपुराव्यात असे कथन केले की, दि. २१/०५/२०२४ रोजी ते रेसुब जेजुरी येथे सहा.उपनिरीक्षक या पदावर कार्यरत होते. त्यादिवशी सायबर सेल पुणे यांचेकडुन एक मोबाईल क्रमांक मिळाला होता ज्यावरुन एक इसम पर्सलन युजर आय.डी बनवुन रेल्वे ई-तिकीटांचा अवैध व्यवसाय करत होता. त्यांनी त्या माहितीवरुन फोनव्दारे संपर्क केला तेव्हा कळाले की, मोनिका हॉटेल, जेजुरी येथे तो इसम आहे, परंतु त्यादिवशी त्यांना तो मिळुन आला नाही. त्यांनी तेथे चौकशी केली असता असे कळाले की, संदीप किराणा स्टोअर्सच्या मागे तो मुलाणी यांच्या घरात भाड्याने राहतो. ते टीमसह तेथे गेले असता तेथे आरोपी व त्याचे मालक त्यांना मिळाले. त्यांनी त्यास त्यांचा परीचय दिला व येण्याचे कारण सांगितले. त्यावेळी आरोपीने त्याचे नाव संदीप बांगर असे सांगितले. त्यावेळी त्याने पर्सनल युजर आय.डीवरुन तिकीट काढत असल्याचे कबुल केले. प्रत्येक तिकीटामागे १००/- रुपये जास्त घेत असल्याचे त्याने सांगितले. त्यानुसार त्यांनी आरोपीविरुध्द **नि.क्र. १२** वरील तक्रार दिली. त्यानंतर त्यांनी आरोपी व त्यांची तक्रार चौकशी अधिकारी डी.के. पटेल यांना सोपवले.

९. उलटतपासात साक्षीदाराने हे मान्य केले की, ते स्वतः घटनास्थळी गेले होते. त्यांचे समक्ष आरोपीने कोणत्याही ग्राहकाकडुन पैसे घेतले नाही. त्यांचेकडे घटनास्थळी जाण्याकरीता लेखी आदेश नव्हता. त्यांचे समक्ष आरोपीकडुन तिकीटे व पर्सनल युजर आय.डी मिळुन आलेला नाही.

१०. तक्रारदारातर्फे अभिलेखावर देण्यात आलेल्या तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, आरोपी हा आयआरसीटीसी मार्फत अधिकृत एजंट नाही. त्याच्याकडे रेल्वेची तिकीटे खरेदी व विक्री करण्याचा कुठलाही परवाना नाही. प्रस्तुतच्या प्रकरणात जी तिकीटे जप्त करण्यात आली आहेत ती रेल्वेची तिकीटे असल्याची बाब अविवादीत आहे. आरोपीने सदरची तिकीटे त्याच्याकडे कुठलाही परवाना नसताना व्यवसायीक नफा

मिळवण्यासाठी विक्री केल्याचे अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरुन दिसुन येत आहे. प्रस्तुतच्या प्रकरणातील तथ्ये विचारात घेतली असता या ठिकाणी मा. सर्वोच्च न्यायालयाचे **एन्सपेक्टर, रेल्वे प्रोटेक्शन फोर्स विरुध्द मॅथ्यु के. चेरीयन २०२५ आयएनएससी ५१** या प्रकरणातील न्यायनिर्णयाचा आधार घेणे गरजेचे ठरते. मा. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात असे नमुद केले की, प्रस्तुतचा गुन्हा घडण्याकरीता ई-तिकीट व कागदी तिकीट यात कुठलाही फरक नाही. प्रस्तुतचे कलम ऑनलाईन मिळणा-या ई-तिकीटांनाही लागु होते. एखादी व्यक्ती व्यावसायीक फायद्यासाठी बनावट आय.डी तयार करुन तिकीटांचा व्यापार करत असेल तर तो फौजदारी गुन्हा ठरतो असे देखील मा.सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने हे देखील आदेशीत केले की, अधिकृत आयआरसीटीसी एजंटने वैयक्तीक आय.डी वापरुन ते तिकीट काढल्यास तो आयआरसीटीसीच्या नियमांचा भंग ठरतो, परंतु कोणत्याही परवान्याशिवाय रेल्वे तिकीटांचा काळाबाजार करणा-या दलालांवर रेल्वे अधिनीयम १९८९ चे कलम १४३ नुसार फौजदारी गुन्हा दाखल होवु शकतो.

११. प्रस्तुतच्या प्रकरणात आरोपी हा आयआरसीटीसीचा अधिकृत एजंट नाही. तसेच त्याच्याकडे तिकीटे खरेदी-विक्री करण्याचा कुठलाही तात्पुरता परवाना देखील नाही. आरोपीने **नि.क्र. १५** वरील घटनास्थळ जप्ती पंचनामा व **नि.क्र. १७** वरील स्वतःचा कबुली जबाब इत्यादी दस्तऐवज मान्य केलेले आहेत. सदरील कबुली जबाब हा सिध्द केलेला असल्यामुळे सरकारपक्षामार्फत इतर पंच साक्षीदार तपासण्यात आलेले नाहीत. प्रस्तुतच्या प्रकरणातील साक्षीदार हे फिर्यादी असुन त्यांनी सरकारपक्षाच्या कथनास त्यांच्या तोंडी पुराव्यातुन दुजोरा दिलेला आहे. त्यांनी आरोपी हा दि. २१/०५/२०२४ रोजी १२.१५ वाजता दिलावर मुलानी यांचे घरात संदीप किराणा स्टोअर्सच्या पाठीमागे, जेजुरी रेल्वे स्टेशन, जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे येथे आरोपी हा रेल्वे ई-तिकीटांची बेकायदेशीर व विनापरवाना खरेदी व विक्री करीत असताना मिळून आला असल्याचे कथन केलेले आहे. आरोपीच्या ताब्यातुन ६ नग अग्रिम यात्रेचे ई -तिकीटे, ०१ रिअलमी कंपनीचा मोबाईल, ०१ सॅमसंग कंपनीचा मोबाईल व १ नग एच. पी. कंपनीचा काळे रंगाचा लॅपटॉप जप्त करण्यात आले आहेत. **नि.क्र. १२** वरील तक्रार ही अभियोगपक्षाने साक्षीदार क्र. १ च्या तोंडी पुराव्यातुन सिध्द केलेले आहेत. आरोपीने सदरची तक्रार खोटी व बनावट आहे हे सिध्द होण्या इतपत कुठलाही पुरावा अथवा साक्षीदाराच्या पुराव्यातील कमतरता उलटतपासात अभिलेखावर आणलेल्या नाहीत.

१२. मा. सर्वोच्च न्यायालय यांनी **''बालकिशन ए. देवीदयाल वि. महाराष्ट्र शासन व**

**इतर १९८१ एससीआर (१) १७५''** या प्रकरणामध्ये निर्देशीत केलेले आहे की, रे.सु.बल कर्मचारी हा पोलीस नसल्याने, आरोपीने रे.सु.बल कर्मचाऱ्यांना दिलेले त्याचे बयान आरोपीविरुद्ध वाचता येते. आरोपीने **नि.क्र. १६/१-६** वरील जप्त तिकीटे व **नि.क्र. १७** वरील कबुली जबाब स्वतः मान्य केल्यामुळे भारतीय पुरावा कायद्याच्या **कलम ५८** नुसार सदरील तिकीटे व जबाब शाबीत झाला असुन आरोपीविरुध्द विचारात घेता येवु शकतात. सरकारपक्षा मार्फत देण्यात आलेला तोंडी व कागदोपत्री पुराव्यावरुन हे सिध्द होते की, दि. २१/०५/२०२४ रोजी १२.१५ वाजता दिलावर मुलानी यांचे घरात संदीप किराणा स्टोअर्सच्या पाठीमागे, जेजुरी रेल्वे स्टेशन, जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे येथे आरोपी हा रेल्वे ई-तिकीटांची बेकायदेशीर व विनापरवाना खरेदी व विक्री करीत होता. सबब, आरोपी हा रेल्वे अधिनीयम, १९८९ च्या **कलम १४३** प्रमाणे दोषी असल्याचे सिध्द होत आहे. वरील कारणांवरुन, मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवतो.

**<u>मुद्दा क्र.२ करीता -</u>**

१३. आरोपीविरुध्द रेल्वे अधिनीयम, १९८९ च्या **कलम १४३** प्रमाणे दोषारोप सिध्द झाल्याने आरोपी हा सदरील कलमांअंतर्गत नमुद शिक्षेस पात्र ठरतो. सबब, आरोपीला त्याच्याविरुद्ध प्रस्तुतचा गुन्हा शाबीत झाल्याचे सांगण्यात आले व शिक्षेबाबत त्याला विचारण्याकरीता याठिकाणी थांबण्यात आले आहे.

**(एन. जे. चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.

पुणे.
दि. ०८/०७/२०२६

१४. आरोपीने त्याच्या बचावात कथन केले की, त्यांच्याकडून चुकीने सदरचा गुन्हा घडलेला आहे. तसेच तो गरीब आहे व त्याचे घरामध्ये एकटेच कमावता आहे. त्याचेवर त्याच्या कुटूंबाची जबाबदारी आहे. यापुढे त्यांच्याकडून असा कोणताही गुन्हा होणार नाही. त्यामुळे त्यांना कमीत कमी शिक्षा करण्यात यावी, अशी त्यांनी विनंती केली. आरोपीच्या विद्वान वकीलांनी देखील त्याचप्रमाणे युक्तीवाद केला.

१५. सरकारपक्षातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, आरोपीचा सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा आहे. त्याच्या कृत्यामुळे प्रवाशांची फसवणुक झालेली आहे. त्यामुळे त्यास सदर गुन्ह्यात जास्तीत जास्त शिक्षा करण्यात यावी.

१६. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. आरोपीने केलेले कथन विचारात घेतले. त्यानुसार असे दिसुन येते की, आरोपीवर त्याच्या कुटूंबाची जबाबदारी आहे व तो गरीब आहे, परंतु या कारणांवरुन त्यांनी केलेल्या गुन्ह्याचे स्वरुप बदलत नाही. आरोपीच्या ताब्यातुन ६ नग अग्रिम यात्रेचे ई -तिकीटे, ०१ रिअलमी कंपनीचा मोबाईल, ०१ सॅमसंग कंपनीचा मोबाईल व १ नग एच. पी. कंपनीचा काळे रंगाचा लॅपटॉप जप्त करण्यात आलेले आहेत. आरोपीने केलेल्या कथनावरुन त्याला त्याने केलेल्या गुन्ह्याचे स्वरुप कळले असून त्यांना त्यांच्या कृत्याचा पश्चाताप होत असल्याचे दिसून येत आहे. आरोपीने रेल्वेची तसेच प्रवाशांची फसवणुक केलेली आहे. त्याच्या या कृत्यामुळे प्रवाशांना नाहक त्रास तसेच अडचणीला सामोरे जावे लागले आहे. परंतु, आरोपीचा न्यायालयासमक्ष व्यवहार, त्याच्यावर असलेली त्याच्या कुटूंबाची जबाबदारी, त्यांची आर्थिक परिस्थिती आणि त्यांना झालेला पश्चाताप व त्यांच्या एकंदर परिस्थितीचा विचार करता पुढीलप्रमाणे द्रव्यदंडाची शिक्षा देणे न्यायाचे उद्देश गाठण्याकरिता पुरेशी होईल. सबब, मुद्दा क्र. २ करीता मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करतो -

| | **आ दे श** |
|---|---|
| १. | आरोपी **संदीप धोंडीराम बांगर** यांना रेल्वे अधिनियम, १९८९ चे **कलम १४३** नुसार भारतीय फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम **२४८(२)** प्रमाणे दोषी ठरविण्यात येते. |
| २. | आरोपीस सदरील अपराधाकरीता **रक्कम रु ६०००/-** द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावण्यात येते. सदरील दंड आरोपीने न भरल्यास त्यास **१२ दिवस** साध्या कारावासाची शिक्षा देण्यात येते. |
| ३. | आरोपीने त्यांचे जामीनपत्र व बंधपत्र जमा करावे. |
| ४. | प्रकरणातील जप्त मुद्देमाल ताब्यातुन **६ नग पुढील यात्रेचे तिकीटे** रेल्वे अधिनियम, १९८९ चे **कलम १४३(१)(ब)** नुसार अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावे. |
| ५. | सुपूर्तनाम्यावर देण्यात आलेला जप्त मुद्देमाल ०१ रिअलमी कंपनीचा मोबाईल, ०१ सॅमसंग कंपनीचा मोबाईल व १ नग एच. पी. कंपनीचा काळे रंगाचा लॅपटॉपचा ताबा नियमानुसार अपील कालावधीनंतर मुळ मालकाकडे कायम करण्यात येतो. |
| ६. | सदर न्यायनिर्णयाची प्रत आरोपीस विनामुल्य देण्यात यावी. |

***( न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषित )***

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2026.07.08 17:15:43 +0530

**(एन.जे.चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.

पुणे.
दि. ०८/०७/२०२६

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी शपथेवर सांगतो की, पी.डी.एफ. न्यायनिर्णयामधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णयातील मजकुराप्रमाणे शब्द-न-शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | - | आर.आर.क्षिरसागर<br>लघुलेखक (श्रेणी III) |
| न्यायालयाचे नाव | - | एन.जे.चव्हाण<br>न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग<br>लोहमार्ग न्यायालय, पुणे. |
| न्यायनिर्णयाची तारीख | - | ०८/०७/२०२६ |
| पिठासीन अधिकाऱ्याने न्यायनिर्णयावर सही केल्याची तारीख | - | ०८/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | - | ०८/०७/२०२६ |